# प्रेसनोट

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे
दि. ०५/११/२०१८

## मौजे तळेगांव ढमढेरे ता. शिरूर जिल्हा पुणे येथील पशुवैद्यकीय दवाखान्यातील परिचरास (शिपाई) दोन हजार रूपयांची लाच स्विकारताना रंगेहात पकडले.

---

यातील तक्रारदार यांचेकडे पाळीव गाय होती. सदर गाईचा मृत्यू झाला होता. गाईचा मृत्यू झाल्यानंतर पोस्टमॉर्टेम करून अहवाल देणेकरीता तळेगांव ढमढेरे ता. शिरूर जिल्हा पुणे येथील पशवैद्यकीय दवाखान्यातील लोकसेवक भुजबळ परिचराने (शिपाई) यांनी तक्रारदार यांचेकडे दोन हजार रूपयांची लाचेची मागणी केली होती. सदर बाबत तक्रारदार यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे कार्यालयामध्ये तक्रार नोंदविली.

सदर तक्रारीची आज दिनांक ०३/११/२०१८ रोजी पडताळणी केली असता, तक्रारदार यांच्या मृत्यू झालेल्या गाईचे पोस्टमॉर्टेम करून अहवाल देणेकरीता लोकसेवक सुर्यकांत भुजबळ, परिचर (शिपाई) याने तक्रारदार यांचेकडे दोन हजार रूपयांची लाचेची मागणी केली.

त्यावरुन आज दिनांक ०५/११/२०१८ रोजी सापळा कारवाई केली असता सापळा कारवाईमध्ये लोकसेवक सुर्यकांत मारूती भुजबळ, वय ५२, परिचर (शिपाई) पशुवैद्यकीय दवाखाना तळेगांव ढमढेरे ता. शिरूर जिल्हा पुणे याने तक्रारदार यांचेकडून २,०००/- रूपयांची लाचेची रक्कम तळेगांव ढमढेरे येथील पशुवैद्यकीय दवाखान्यात स्विकारल्यावर त्यास रंगेहात पकडण्यात आले असुन त्याचेवर शिक्रापूर पोलीस स्टेशन, पुणे ग्रामीण येथे लाचलुचपत प्रतिबंधक कायद्याप्रमाणे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रीया सुरू आहे.

सदरची कारवाई ही मा. पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री. संदीप दिवाण यांचे मार्गदर्शनाखाली पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली.

शासकीय लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील नमुद क्रमांकावर सपर्क साधण्याबाबतचे आवाहन श्री. संदीप दिवाण, पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे यांनी केले आहे.

१. <u>हेल्पलाईन टोल फ्री क्रमांक १०६४</u>
२. ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे -
   दुरध्वनी क्रमांक - ०२० - २६१२२१३४, २६१३२८०२, २६०५०४२३
३. व्हॉट्स-ॲप क्रमांक पुणे - ७८७५३३३३३३
४. व्हॉट्स-ॲप क्रमांक मुंबई - ९९३०९९७७००
५. ई-मेलआयडी- पुणे **dyspacbpune@mahapolice.gov.in**
६. फेसबुकपेज- **www.facebook.com-maharashtraACB**
७. वेबसाईट- **www.acbmaharashtra.gov.in**

( सुहास नाडगौडा )
सहायक पौलीस आयुक्त/पोलीस उप अधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे.